—: प्रेसनोट :— दिनांक : ०२/११/२०२०

यातील फिर्यादी यांच्या भाजी विक्रेता व्यवसायावर बी.एम.सी. अतिक्रमण निमुर्लन विभागातंर्गत करण्यात आलेल्या कारवाईनंतर फिर्यादी यांचे भाजी विक्रीचे सामान परत देण्याकरीता यातील आरोपी लोकसेवक यांनी रू. २५०/— लाचेची मागणी करून स्विकारली म्हणून गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| ला.प्र. विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १९/२०२० |
| कलम | कलम ७, १२ भ्र. प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) विश्वास रामचंद्र नाडकर, वय ४५ वर्षे, धंदा— कामगार, नेमणुक — अतिक्रमण निर्मुलन, के/पुर्व वॉर्ड, पश्चिम उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी पुर्व, मुंबई — ९३<br>२) रमांकात लक्ष्मण सोनकांबळे, वय ३२ वर्षे, धंदा— लिपीक, नेमणुक — अतिक्रमण निर्मुलन, के/पुर्व वॉर्ड, पश्चिम उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी पुर्व, मुंबई — ९३<br>३) हर्षद हिराजी वरळीकर, वय ३१ वर्षे, धंदा— सुरक्षा रक्षक, नेमणुक — सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा, महाराष्ट्र शासन स्थापित, डी—३०१/ई— ३०१, सानापाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स, सानपाडा, नवी मुंबई. |
| लाचेची मागणी रक्कम | रु. २५०/— |
| स्विकारलेली रक्कम | रू. २५०/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांचा रोड क्रोस वर्तक नाका, विलेपार्ले येथे भाजीपाला विक्रीचा व्यवसाय आहे. त्यावर दिनांक २९/१०/२०२० रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पुर्व विभागार्तगत अतिक्रमण निर्मुलन पथकाने कारवाई दरम्यान फिर्यादी यांचे भाजीविक्रीचे सामान घेवून गेले होते. फिर्यादी हे त्यांचे भाजीविक्रीचे सामान परत मिळविण्याकरीता बृन्हमुंबई महानगर पालिका, सहाय्यक आयुक्त (अ.नि.) पश्चिम उपनगरे यांचे गोदाम, फ्लोअर डेक प्लाझा बेसमेंट, एम.आय.डी.सी., सी सेंट्रल रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई गेले असता, ताब्यात घेतलेले सामान कारवाई न करता सोडविण्यासाठी यातील आलोसे क्र.२ यांनी लाचेची मागणी केली होती.<br>फिर्यादी यांना नमूद लोकसेवकास लाच दयायची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे दिनांक २९/१०/२०२० रोजी समक्ष हजर राहून आरोपी लोकसेवका विरूध्द लेखी तक्रार दिली.<br>फिर्यादी यांच्या लेखी तक्रारीवरून दिनांक ३१/१०/२०२० रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे क्र.१ यांनी लाचेची मागणी केली. त्यांनतर सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. २ यांनी लाच स्वीकारून आलोसे क्र ३ यांना त्यातील ५०/— रू दिले. आलोसे क्र २ व ३ यांना पंचासमक्ष रंगेहात पकडून आलोसे क्र १ यांना देखील ताब्यात घेण्यात आले. सदरबाबत वरिलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. |

अपर पोलीस उप-आयुक्त ★ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ★ सत्यमेव जयते बृहन्मुंबई

( हेमंत सावंत )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.**

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.
संकेतस्थळ—acbmaharashtra.gov.in
ईमेल :(1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
ऑन लाईन तक्रार ॲप्लीकेशन- www.acbmaharashtra.net
टोलफ्री क्र.१०६४
दूरध्वनी क्र.०२२-२४९२१२१२,फॅक्स क्र.०२२-२४९२२६१८,
व्हॉट्स ॲप क्रमांक-९९३०९९७७००

Scanned with CamScanner